# ट्युलिप
मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल

दंत रोग विभाग



## दंत उपचाराविषयी माहिती

### १) दात स्वच्छ करणे



दातांच्या मध्ये जमा झालेली घाण मशीनद्वारे स्वच्छ केल्यास
१) दात आवळून येतात
२) दात पिवळे पडत नाहीत
३) तोंडातुन दुर्गंधी कमी होते
४) दात घासताना होणारा रक्तस्त्राव थांबतो

### २) दातात सिमेंट भरणे



दातांच्या वरील बाजुस छोटे काळे डाग असतील किंवा छोटासा खड्डा तयार झाला असेल आणि त्यात अन्न अडकत असल्यास त्या जागी चांदी किंवा दाताच्या कलरचे सिमेंट भरुन घेणे गरजेचे आहे. नाहीतर भविष्यात त्या दातांचे रुट कॅनल उपचार करावे लागणार किंवा तो दात काढून टाकावे लागणार.

### ३) रुट कॅनल ट्रिटमेंट



ज्यावेळेस दातांची किड नसापर्यंत पोहोचते आणि दात दुखण्यास सुरवात होते किंवा हिरडीला सुज येते. त्यावेळेस रुट कॅनल ट्रिटमेंट द्वारे दात वाचवू शकतो आणि कॅप बसवल्यास दातांचे आयुष्य वाढते.

### ४) फिक्स दात बसवणे



काही कारणास्तव दाढ काढली असेल तर त्याबाजुने अन्न नीट चावणे कठीण जाते. त्यावेळेस आजुबाजूंच्या दातांच्या सहाय्याने फिक्स दात बसवले जातात.

### ५) कॉसमेटीक डेन्टल ट्रिटमेंट



या उपचारामध्ये समोरच्या दातांमधील फटी भरले जातात. जर दातांच्या वरील बाजुस फ्लोराईड डाग असतील तर ब्लिचिंग द्वारे दात पांढरे केले जातील. तसेच स्माईल करेक्शन केले जाते.

### ६) लहान मुलांच्या दातांची ट्रिटमेंट



दुधाचे दात पडणारे असतात म्हणून लक्ष दिले जात नाही पण ते ठरावीक वयातच पडतात आणि दुधाच्या दाताच्या खाली परमनंट दातांची वाढ होत असते. दूधाच्या दाताचे इन्फेक्शन खाली वाढत असलेल्या परमनंट दातांना लागु शकते. दुधाचे दात पडण्याआधी काढून टाकले तर येणारे नवीन दात वेडे वाकडे येवू शकतात. त्यामुळे दुधाचे दात वाचविण्याची गरज आहे.

### ७) री इम्प्लाटेंशन



या उपचारामध्ये एखाद्यी व्यक्ती तोंडावर पडली असेल किंवा मार लागला असेल आणि त्याचा परमनंट दात मुळासहित हिरडीतुन बाहेर निघाला असेल अशावेळी तो दात आहे तसा त्यांच्या हिरडीमध्ये बसवून आजुबाजूस दातांच्या बरोबर फिक्स केला जातो.

*It All Starts With Your*

# *Smile...*



*A Beautiful Smile creates confidence...*
*The confidence in your Smile increases self esteem*

### हे सुंदर हास्य टिकवण्यासाठी घ्यावयाची काळजी

- दिवसातून २ वेळा दंतवैद्यांनी सुचवलेल्या पद्धतीने ब्रश करणे
- कमीत-कमी २ मिनीटे प्रत्येक दातांच्या पाचही बाजूस ब्रश करणे
- दर तीन महिन्यांनी ब्रश बदलणे
- रोज न चुकता माऊथ वॉश वापरणे
- प्रत्येक वेळी खाल्यानंतर चुळा भरणे
- रात्रीच्या वेळी चिकट आणि गोड पदार्थ खाणे टाळावे.
- दर वर्षातुन एकदा दात साफ करुन घेणे.
- दंत वैद्यांची अवश्य भेट घ्यावी.

ट्युलिप
मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल

मार्केट यार्ड रोड, रुईकर कॉलनी समोर,
हॉटेल महाराजा शेजारी, कोल्हापूर
फोन : ०२३१- २६६६६८९ / ९८